भाजीपाला रोपमळे, फळरोपमळे व स्थानिक उदयाने योजनेत्तर योजनेस सन २०१८-१९ साठी प्रशासकीय मान्यता देणेबाबत.

महाराष्ट्र शासन
कृषि, पशुसंवर्धन,दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग,
शासन निर्णय क्रमांक :- फरोवा-२०१८/प्र.क्र.१००/१३-अे,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२,
दिनांक :- २२ मे, २०१८

<u>संदर्भ</u> :- १) नियोजन विभाग,क्र.डिएपी-१०१६ /प्र.क्र.२११/कार्यासन-१४८१,दि. २०/२/२०१७.
२) शासन निर्णय क्र. फरोवा-२०१६/प्र.क्र.१४३/१३-अे, दि. १० जुलै,२०१७.
३) कृषि आयुक्तालयाचे पत्र क्र. कृआ/फलो-२/शारोवा/प्र.मान्य/१८, दि.निरंक.

<u>प्रस्तावना:-</u>

राज्यात १३६ शासकीय फळरोपवाटिका कार्यरत आहेत. सदर फळरोपवाटिकांवर नवीन व सुधारित वाणांच्या विविध फळझाडांच्या मातृवृक्षांची लागवड केलेली आहे. या मातृवृक्षांपासून विविध फळझाडांची दर्जेदार व जातीवंत सुमारे ४० लाख कलमे/ रोपे उत्पादित करण्यात येतात. यातुन शासनास रक्कम रुपये ७.०६ कोटी इतका महसुल जमा होतो.

सदर कलमे / रोपे शासनामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांतर्गत फळबाग लागवड कार्यक्रमासाठी पुरविण्यात येतात. शासकीय रोपवाटिकांवर प्रामुख्याने कलमे / रोपे उत्पादनाकरिता आवश्यक सामग्री, मजुरी आणि गौण बांधकामे या बाबींकरीता निधीची आवश्यकता असते. तसेच रोपवाटिकांवरील मंजुर अधिकारी व कर्मचारी यांचे वेतन यामधून अदा करण्यात येते. प्रक्षेत्रासंबधीत न्यायालयीन प्रकरणांचा खर्च यातुन भागविण्यात येतो. त्यासाठी शासकीय रोपवाटिकांना नियमित अनुदान उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. भाजीपाला रोपमळे, फळरोपमळे व स्थानिक उदयाने योजनेत्तर योजनेस (२४०१ १७२२) सन २०१८-१९ साठी प्रशासकीय मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

<u>शासन निर्णय</u> -

शासकीय रोपवाटिकांवर प्रामुख्याने कलमे / रोपे उत्पादनाकरिता आवश्यक सामग्री, मजुरी आणि गौण बांधकामे या बाबींकरीता निधीची आवश्यकता असते. तसेच रोपवाटिकांवरील मंजुरी अधिकारी व कर्मचारी यांचे वेतन यामधून अदा करण्यात येते. प्रक्षेत्रासंबधीत न्यायालयीन प्रकरणांचा

खर्च यातुन भागविण्यात येतो. त्यासाठी शासकीय रोपवाटिकांना नियमित अनुदान उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. भाजीपाला रोपमळे, फळरोपमळे व स्थानिक उदयाने योजनेत्तर योजनेस (२४०१ १७२२) सन २०१८-१९ साठी प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०५२२१७२८२४४००१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Chandrakumar Vithal Ghaytadak

Digitally signed by Chandrakumar Vithal Ghaytadak
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Agriculture And ADF Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=034948ccd1f6b6c67380c817b34a9af75fcfa679a4609321f9da27d9ab87b0d1, cn=Chandrakumar Vithal Ghaytadak
Date: 2018.05.22 17:26:11 +05'30'

(च.वि.घायतडक)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. आयुक्त कृषी, महाराष्ट्र राज्य,पुणे.
२. संचालक फलोत्पादन, कृषी आयुक्तालय,महाराष्ट्र राज्य,पुणे,
३. सर्व संचालक, कृषी आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य,पुणे,
४. सर्व विभागीय कृषी सहसंचालक,
५. सर्व जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी,
६. महालेखापाल-१/२, (लेखा व अनुज्ञेयता) मुंबई /नागपूर,
७. महालेखापाल-१/२ , (लेखा परीक्षा) मुंबई /नागपूर,
८. वरिष्ठ जिल्हा कोषागार अधिकारी,पुणे.
९. संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई
१०.सहसंचालक लेखा व कोषागारे, संगणक कक्ष, नवीन प्रशासन भवन, ५ वा मजला, मुंबई -३२,
११.अवर सचिव, कार्या-१४८१, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
१२.कक्ष अधिकारी (अर्थसंकल्प), कृषि व पदुम (कृषि व फलोत्पादन) विभाग, मंत्रालय,मुंबई.
१३.कक्ष अधिकारी (पदुम-१६), कृषि व पदुम (कृषि व फलोत्पादन) विभाग, मंत्रालय,मुंबई.
१४.निवड नस्ती (१३-अे)